बेलापूर, तुर्भे, वाशी व ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई

नवी मुंबई, दि. ०७ (वार्ताहर) : नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (2) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) श्री. भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर, तुर्भे, ऐरोली व वाशी विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बेलापूर विभागाअंतर्गत श्री. निलेश महादेव म्हात्रे व इतर, घर क्र. ८७६/००१ करावे गांव से.३६ नवी मुंबई यांचे अनधिकृत बांधकामास अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत MRTP कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने संबधितांनी अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविने आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

सदर अनधिकृत बांधकामावर अे विभाग कार्यालय बेलापूर, नमुंमपा व सिडको विभाग कार्यालयामार्फत संयुक्त तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकामावर निष्कासित कारवाई करण्यात आली आहे. या धडक मोहिमेसाठी बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे, कनिष्ठ अभियंता श्री. आत्माराम काळे व अतिक्रमण विभागातील अधिकारी/ कर्मचारी, मजूर-१०, तसेच सुरक्षारक्षक उपस्थित होते.नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभागाअंतर्गत श्री.मोहमद शाबीर, घर क्र. A-२/४२५ से.२१, तुर्भे, नवी मुंबई, यांनी विनापरवानगी सुमारे ५.८० मी. X ४.१० मी.या मोजमापाचे (G+३ चे R.C.C. बांधकाम सुरु होते.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभागाअंतर्गत श्री. ह्यातुल्लाह मौलाना, घर क्र. A-२/४४४ से.२१, तुर्भे, नवी मुंबई, यांनी विनापरवानगी सुमारे ५.८० मी. X ४.१० मी. या मोजमापाचे G+३ चे R.C.C. बांधकाम सुरु होते. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभागाअंतर्गत श्री. नंदलाल यादव, घर क्र. A-२/११६ से. २१, तुर्भ, नवी मुंबई, यांनी विनापरवानगी सुमारे ६.०० मी. x ५.६० मी. या मोजमापाचे G+४ चे R.C.C. बांधकाम सुरु होते.

सदर अनधिकृत बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आलेली होती. परंतु, सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरुच होते. सदर अनधिकृत बांधकामावर तुर्भे विभाग कार्यालयामार्फत तोडक कारवाईच्या मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आलेले आहे.

या धडक मोहिमेसाठी तुर्भ विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी श्री. प्रबोधन मवाडे, कनिष्ठ अभियंता श्री. विनोद आंब्रे, अतिक्रमण विभागातील अधिकारी/कर्मचारी, तसेच अतिक्रमण निर्मुलन पथकातील पोलीस अधिकारी/ अंमलदार उपस्थित होते. या मोहिमेकरीता ०२ ब्रेकर व ०१ गॅसकटर यांचा वापर करण्यात आलेला आहे. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत जे - १९५, जे - १०३ व जे - १०४, सेक्टर-०३, ऐरोली, येथील बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे केलेले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविले नसल्याने सदरचे अनधिकृत बांधकाम आज दिनांक ०६/०३/2०2५ रोजी अतिक्रमण मोहिम राबवून सदर बांधकाम अंशतः निष्कासित करण्यात आले आहे.

या धडक मोहिमेसाठी जी विभाग ऐरोलीचे सहाय्यक आयुक्त डॉ. अंकुश जाधव व कनिष्ठ अभियंता श्री. संदीप म्हात्रे तसेच जी विभाग ऐरोली, येथील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. सदर मोहिमेकरीता ०१ गॅस कटर, ०३ ब्रेकर व ०८ मजूर यांचा वापर करण्यात आलेला आहे. सदर कारवाई अंतर्गत दंडात्मक शुल्क रूपये ७५,०००/- वसूल करण्यात आले आहे.

तसेच वाशी सेक्टर- ३० A येथे बेकायदेशीर / अनधिकृत झोपडपटटया वसलेल्या आहेत तसेच वाशीगांव परिसरात नमुंमपा व सिडकोच्या जागेवर अनधिकृत झोपडया वसलेल्या आहेत. सदर झोपडपटटयांवर तोडक कारवाई करुन एकूण १२७ अनाधिकृत झोपड्या निष्कासित करण्यात आल्या. या धडक मोहिमेसाठी वाशी विभाग कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्त श्रीम. अलका महापुरकर, कनिष्ठ अभियंता श्री. मंगेश मेहेर व कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी, सुरक्षा रक्षक उपस्थित होते. तसेच सदर झोपड्या मजूर व जेसीबी च्या सहाय्याने निष्कासित करण्यात आल्या. यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

विरार पश्चिम येथील पारनाका येथे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत श्रमदान मोहीम आणि सफाई कर्मचारी सन्मान सोहळा संपन्न

विरार, दि. ०७ (वार्ताहर) : वसई विरार शहर महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभाग, सहयोगी संस्था अलाईट सोल्युशन सर्विसेस यांचेमार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान व स्वच्छ वसई विरार अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी, श्रमदान मोहीम, आणि सफाई कर्मचारी सन्मान सोहळा व स्वच्छ मार्च रॅलीचे आयोजन करण्यात आले.

प्रभाग समिती (आय) येथील श्रमदान माहिमे मध्ये, शाळा, महाविद्यालयात शिक्षक विद्यार्थी, समाजसेवक, लोकप्रतिनिधी, पर्यावरण प्रेमी, सोसायटी मधील नागरीक, महिला बचतगटातील महिला, आशावर्कर, ANM कर्मचारी, इत्यादी यावेळी उपस्थित होते.

सर्वांनी वसई पश्चिमेकडील पारनाका रोड ते भास्कर आळी उद्यान पर्यंत स्वच्छता करून श्रमदान केले. या मोहिमेत १५० ते २०० विद्यार्थी, नागरिकांनी सहभाग घेतला.

प्रभाग समिती "आय" मध्ये ३५० सफाई कर्मचारी आहेत त्या मधून सर्वोत्तम दहा सफाई कर्मचारी यांची निवड करण्यात आली. वसई विरार महापालिका स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सातत्याने उपक्रम राबवत असून विविध उपक्रमाच्या माध्यमातून लोकांमध्ये जनजागृती करत आहे. त्याच बरोबर शहरातील प्रमुख ठिकाणी स्वच्छतेचे संदेश देण्यासाठी शहरात सुशोभीकरण केले आहे. यामुळे पालिकेच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

याच अनुषंगाने वसई-विरार महानगरपालिका आणि संयोगी संस्थांच्या प्रयत्नांमुळे स्वच्छता मोहीम अधिक प्रभावीपणे पार पडली.

बजाज फायनान्स लिमिटेड BAJAJ FINSERV

नोंदणीकृत कार्यालय : बजाज फायनान्स लिमिटेड, सी/ओ बजाज ऑटो लिमिटेड कॉम्प्लेक्स मुंबई पुणे रोड आकुर्डी पुणे ४११०३५ **कॉर्पोरेट कार्यालय :** बजाज फायनान्स लिमिटेड, पुणे-अहमदनगर रोडच्या बाहेर, विमान नगर, पुणे ४११०१४ **शाखा कार्यालय :** बजाज फायनान्स लिमिटेड ११ वा मजला आशार आयटी पार्क रोड क्रमांक १६ वागळे औद्योगिक इस्टेट कृषी कार्यालयाजवळ ठाणे डब्ल्यू ४००६०४ **अधिकृत अधिकाऱ्यांची माहिती: नाव :** अरसलान शेख ईमेल आयडी: arsalan.shekh@bajajfinserv.in **मोबाईल क्रमांक** +९१ ८२००९०९३७२

परिशिष्ट ४-ए (नियम ८ (६) मधील तरतूदी पहा)

सरफेसी कायदा २००२ अंतर्गत ई-लिलाव विक्री सूचना

आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा हितसंबंध अंमलबजावणी कायदा, २००२ (ॲक्ट) अंतर्गत स्थावर मालमत्तेची विक्री

सूचना बजाज फायनान्स लिमिटेड (बीएफएल) कडे गहाण ठेवलेली आणि अधिनियमाच्या तरतुदींनुसार बीएफएलच्या अधिकृत अधिकाऱ्याने ताब्यात घेतलेली खालील सुरक्षित मालमत्तेच्या संदर्भात सर्वसाधारणपणे आणि कर्जदार/सह-कर्जदार/गहाणखतदारांना माहिती देण्यात येत आहे. येथे नमूद केलेल्या रकमेची आणि पुढील लागू व्याज, शुल्क आणि खर्च इत्यादींच्या वसुलीसाठी लिलावाद्वारे विक्री केली जाईल. खाली वर्णन केलेली सुरक्षित मालमत्ता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियमांच्या नियम क्रमांक ८ आणि ९ (नियम) अंतर्गत जसे आहे तिथे, **जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते आहे** वर खालीलप्रमाणे तपशीलवार देय रकमेच्या वसुलीसाठी विकली जात आहे :

ई-लिलावाचे तपशील

कर्जदाराचे नाव आणि पत्ता	**१. मेसर्स. तनिष एन्टर. त्यांचे प्रोप्राय्टर :** राहणार ३ रा मजला, २५९ ३०२ सुधा केशव अपार्टमेंट रेती बंदर रोड कशेली ठाणे महाराष्ट्र ठाणे ४२१३०२ **तसेच** राहणार पत्ता : कार्यालय क्रमांक एसएफ/६, एसएफ/७, एसएफ/११ -२ रा मजला आर.एस. क्रमांक ३३३/२/पैकी/२ सीएस क्रमांक २४० पैकी एफ.पी. क्रमांक ८४ टीपी क्रमांक २६ कार्यालय क्रमांक एसएफ/६/एसएफ/७, एसएफ/११ २ रा मजला अर्थ अल्फा टॉवर अल्फा, मौजे:-तांडलजा ता. आणि जिल्हा-वडोदरा गुजरात ३९०००७. **२. यश हितेश सोलंकी** निवासस्थान ए१ जलपा सोसायटी ग्रीनलैंड सोसायटीच्या मागे आणि वॉर्ड क्रमांक ११ एस्सार पेट्रोल पंप जवळ कार्यालय सेळ मंडळ हरी नगर वडोदरा वडोदरा ३९००२१ गुजरात **३. दिपल हितेश सोलंकी** निवासस्थान ए१ जलपा सोसायटी ग्रीनलैंड सोसायटीच्या मागे आणि वॉर्ड क्रमांक ११ एस्सार पेट्रोल पंप जवळ कार्यालय सेळ मंडळ हरी नगर वडोदरा वडोदरा ३९००२१ गुजरात. **४. हितेश मणिलाल सोलंकी** निवासस्थान ए१ जलपा सोसायटी ग्रीनलैंड सोसायटीच्या मागे आणि वॉर्ड क्रमांक ११ कार्यालय एस्सार पेट्रोल पंप जवळ सेळ मंडळ हरी नगर वडोदरा वडोदरा ३९००२१ गुजरात संपर्क- ९८२०४०३१३५ ईमेल- tanishent27@gmail.com
कर्ज खाते क्रमांक	**पी५७७पीबीएल०८६५८१७**
अनुच्छे १३(२) तारीख आणि रक्कम अंतर्गत सूचनेनुसार वैधानिक मागणी सूचना	सूचना दि. ०८.०४.२०२४ मागणी रक्कम २९,९३,६०४/-
०३.०३.२०२५ रोजीची थकबाकी रक्कम	**रु.२९,८०,१०३/- (रुपये एकोणतीस लाख ऐंशी हजार एकशे तीन फक्त)**
स्थावर मालमत्तेचे वर्णन	सर्व तो भाग व भूखंड असलेले कार्यालय क्र. एसएफ/६, एसएफ/७, एसएफ/११ -दुसरा मजला आर.एस. क्रमांक ३३३/२/पैकी/२ सी एस क्रमांक २४० पैकी एफ.पी. क्रमांक ८४ टी पी क्रमांक २६ अर्थ अल्फा टॉवर अल्फा, मौजे-तांडलजा, ता. आणि जिल्हा-वडोदरा गुजरात ३९०००७ चे सर्व तुकडे आणि पार्सल सामायिक क्षेत्रांमध्ये प्रमाणित वाटासह, त्यापैकी **कार्यालय क्रमांक एसएफ-११** (क्षेत्र प्रशासन २१.१३ चौ. मीटर आणि अविभाजित आणि प्रमाणित जमीन प्रशासन ९.५५ चौ. मीटर) **अशी सीमा:-** पूर्वेकडे-कॉमन पॅसेज, पश्चिमेस : अर्थ आफ्रिका टॉवर, एच, उत्तरेस : शिडघा, दक्षिणेस : कार्यालय क्र. एसएफ/१०
आरक्षित किंमत रु. मध्ये	**रु. १३,४३,४३०/- (रुपये तेरा लाख त्रेचाळीस हजार चारशे तीस मात्र)**
इरठे	**रु. १,३४,३४३/-**
ई-लिलाव तारीख व वेळ	दि. १०.०४.२०२५ रोजी स. ११.०० ते १.००
ई-लिलाव पोर्टल	**https://bankauctions.in**
ईएमडी सादर करण्याची शेवटची तारीख	०९.०४.२०२५
बोली वाढीची रक्कम रु.	रु. २५०००/-
सुरक्षित धनकोला ज्ञात असलेले अडथळे	ज्ञात नाही
मालमत्तेची पडताळणी तारीख	०६.०३.२५ ते ०८.०४.२५ रोजी कार्यरत दिवशी १.३० ते ५.०० दरम्यान पूर्व सूचना देऊन.

सर्वसाधारण आणि विशेषत: कर्जदारांनी कृपया लक्षात ठेवा की जर येथे निर्धारित तारखेला लिलाव कोणत्याही कारणास्तव अवास्तवी झाला तर सुरक्षित धनकी खाजगी कराराद्वारे विक्रीद्वारे सुरक्षित धनकोच्या विवेकबुद्धीनुसार सुरक्षा व्याज लागू करू शकतो. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, कृपया **https://bankeauctions.in and https://www.bajajfinserv.in/sarfaesi-auction-notices** ही लिंक पहा.

तारीख: ०३.०३.२०२५
ठिकाण: पुणे

बजाज फायनान्स लिमिटेड
अधिकृत अधिकारी

कोट्यवधींच रक्तचंदन मुंबईमार्गे दुबईला जाणार होतं; या प्रकरणी आतापर्यंत पाच जणांना अटक

पिंपरी- चिंचवड, दि. ०७ (वार्ताहर) : पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर नुकतंच साडेआठ कोटींचं रक्तचंदन जप्त करण्यात आलं होतं. या प्रकरणी राजाराम गंगाराम गायखे व हरप्रीतसिंग धरमसिंग बदाना या दोघांना अटक करण्यात आली होती. त्यांच्यावर शिरगाव परंदवाडी पोलीस ठाण्यात गुन्हादेखील दाखल करण्यात आला होता. पोलिसांच्या पुढील तपासात आणखी तिघांची नावं समोर आलेली आहेत. त्यांना पोलिसांनी अटक केली आहे. दक्षिण भारतातून आलेलं हे रक्तचंदन मुंबईमार्गे दुबईला जाणार होतं, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. परंतु, त्यापूर्वीच हे रक्तचंदन पोलिसांनी हस्तगत केलं. या प्रकरणात आणखी आरोपी असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. त्यांच्यापर्यंत पोहोचणं पोलिसांसाठी मोठं आव्हान असेल.

श्रीकांत शंकर भिलारे, इंद्रावन बाबाजी माने व दीपक पोपट साळवे यांना या गुन्ह्याप्रकरणी बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. आतापर्यंत या गुन्ह्यामध्ये पाच जणांना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी तीन जण मुख्य आरोपी असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

२ मार्च रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरून रक्तचंदनाची तस्करी केली जाणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. मालमत्ताविरोधी पथकाने तत्काळ उर्से टोल नाका येथे सापळा रचला. त्यामध्ये पुणे-बंगळुरू महामार्गावरून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनर पोलिसांनी पकडला होता.

बजाज फायनान्स लिमिटेड BAJAJ FINSERV

नोंदणीकृत कार्यालय : बजाज फायनान्स लिमिटेड, सी/ओ बजाज ऑटो लिमिटेड कॉम्प्लेक्स मुंबई पुणे रोड आकुर्डी पुणे ४११०३५ **कॉर्पोरेट कार्यालय :** बजाज फायनान्स लिमिटेड, पुणे-अहमदनगर रोडच्या बाहेर, विमान नगर, पुणे ४११०१४ **शाखा कार्यालय :** बजाज फायनान्स लिमिटेड ११ वा मजला आशार आयटी पार्क रोड क्रमांक १६ वागळे औद्योगिक इस्टेट कृषी कार्यालयाजवळ ठाणे डब्ल्यू ४००६०४ **अधिकृत अधिकाऱ्यांची माहिती: नाव :** अरसलान शेख ईमेल आयडी: arsalan.shekh@bajajfinserv.in **मोबाईल क्रमांक** +९१ ८२००९०९३७२

परिशिष्ट ४-ए (नियम ८ (६) मधील तरतूदी पहा)

सरफेसी कायदा २००२ अंतर्गत ई-लिलाव विक्री सूचना

आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा हितसंबंध अंमलबजावणी कायदा, २००२ (ॲक्ट) अंतर्गत स्थावर मालमत्तेची विक्री

सूचना बजाज फायनान्स लिमिटेड (बीएफएल) कडे गहाण ठेवलेली आणि अधिनियमाच्या तरतुदींनुसार बीएफएलच्या अधिकृत अधिकाऱ्याने ताब्यात घेतलेली खालील सुरक्षित मालमत्तेच्या संदर्भात सर्वसाधारणपणे आणि कर्जदार/सह-कर्जदार/गहाणखतदारांना माहिती देण्यात येत आहे. येथे नमूद केलेल्या रकमेची आणि पुढील लागू व्याज, शुल्क आणि खर्च इत्यादींच्या वसुलीसाठी लिलावाद्वारे विक्री केली जाईल. खाली वर्णन केलेली सुरक्षित मालमत्ता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियमांच्या नियम क्रमांक ८ आणि ९ (नियम) अंतर्गत जसे आहे तिथे, जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते आहे वर खालीलप्रमाणे तपशीलवार देय रकमेच्या वसुलीसाठी विकली जात आहे :

ई-लिलावाचे तपशील

कर्जदाराचे नाव आणि पत्ता	**१. मेसर्स. तनिष एन्टर. त्यांचे प्रोप्राय्टर :** राहणार ३ रा मजला, २५९ ३०२ सुधा केशव अपार्टमेंट रेती बंदर रोड कशेली ठाणे महाराष्ट्र ठाणे ४२१३०२ **तसेच** राहणार पत्ता : कार्यालय क्रमांक एसएफ/६, एसएफ/७, एसएफ/११ -२ रा मजला आर.एस. क्रमांक ३३३/२/पैकी/२ सीएस क्रमांक २४० पैकी एफ.पी. क्रमांक ८४ टीपी क्रमांक २६ कार्यालय क्रमांक एसएफ/६/एसएफ/७, एसएफ/११ २ रा मजला अर्थ अल्फा टॉवर अल्फा, मौजे:-तांडलजा ता. आणि जिल्हा-वडोदरा गुजरात ३९०००७. **२. यश हितेश सोलंकी** निवासस्थान ए१ जलपा सोसायटी ग्रीनलैंड सोसायटीच्या मागे आणि वॉर्ड क्रमांक ११ एस्सार पेट्रोल पंप जवळ कार्यालय सेळ मंडळ हरी नगर वडोदरा वडोदरा ३९००२१ गुजरात **३. दिपल हितेश सोलंकी** निवासस्थान ए१ जलपा सोसायटी ग्रीनलैंड सोसायटीच्या मागे आणि वॉर्ड क्रमांक ११ एस्सार पेट्रोल पंप जवळ कार्यालय सेळ मंडळ हरी नगर वडोदरा वडोदरा ३९००२१ गुजरात. **४. हितेश मणिलाल सोलंकी** निवासस्थान ए१ जलपा सोसायटी ग्रीनलैंड सोसायटीच्या मागे आणि वॉर्ड क्रमांक ११ कार्यालय एस्सार पेट्रोल पंप जवळ सेळ मंडळ हरी नगर वडोदरा वडोदरा ३९००२१ गुजरात संपर्क- ९८२०४०३१३५ ईमेल- tanishent27@gmail.com
कर्ज खाते क्रमांक	**पी५७७पीबीएल०८६५८१७**
अनुच्छे १३(२) तारीख आणि रक्कम अंतर्गत सूचनेनुसार वैधानिक मागणी सूचना	सूचना दि. ०८.०४.२०२४ मागणी रक्कम २९,९३,६०४/-
०३.०३.२०२५ रोजीची थकबाकी रक्कम	**रु.२९,८०,१०३/- (रुपये एकोणतीस लाख ऐंशी हजार एकशे तीन फक्त)**
स्थावर मालमत्तेचे वर्णन	सर्व तो भाग व भूखंड असलेले कार्यालय क्र. एसएफ/६, एसएफ/७, एसएफ/११ -दुसरा मजला आर.एस. क्रमांक ३३३/२/पैकी/२ सी एस क्रमांक २४० पैकी एफ.पी. क्रमांक ८४ टी पी क्रमांक २६ अर्थ अल्फा टॉवर अल्फा, मौजे-तांडलजा, ता. आणि जिल्हा-वडोदरा गुजरात ३९०००७ चे सर्व तुकडे आणि पार्सल सामायिक क्षेत्रांमध्ये प्रमाणित वाटासह, त्यापैकी **कार्यालय क्रमांक एसएफ-०६** (क्षेत्र प्रशासन १५.३३ चौ. मीटर आणि अविभाजित आणि प्रमाणित जमीन प्रशासन ६.८१ चौ. मीटर) **अशी सीमा:-** पूर्वेकडे-कार्यालय क्रमांक एसएफ/६; पश्चिमेला- कार्यालय क्रमांक एसएफ/८; उत्तर-खुल्या मार्गावर; दक्षिणेला- पीएफ क्र. ८८
आरक्षित किंमत रु. मध्ये	**रु. ९,३९,२६२.५०/- (रुपये नऊ लाख एकोणचाळीस हजार दोनशे बासष्ट व पन्नास पैसे फक्त)**
इरठे	**रु. १३,९२६.२५/-**
ई-लिलाव तारीख व वेळ	दि. ११.०४.२०२५ रोजी स. ११.०० ते १.००
ई-लिलाव पोर्टल	https://bankauctions.in
ईएमडी सादर करण्याची शेवटची तारीख	१०.०४.२०२५
बोली वाढीची रक्कम रु.	रु. २५०००/-
सुरक्षित धनकोला ज्ञात असलेले अडथळे	ज्ञात नाही
मालमत्तेची पडताळणी तारीख	०६.०३.२५ ते ०९.०४.२५ रोजी कार्यरत दिवशी १.३० ते ५.०० दरम्यान पूर्व सूचना देऊन.

सर्वसाधारण आणि विशेषत: कर्जदारांनी कृपया लक्षात ठेवा की जर येथे निर्धारित तारखेला लिलाव कोणत्याही कारणास्तव अवास्तवी झाला तर सुरक्षित धनकी खाजगी कराराद्वारे विक्रीद्वारे सुरक्षित धनकोच्या विवेकबुद्धीनुसार सुरक्षा व्याज लागू करू शकतो. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, कृपया **https://bankeauctions.in and https://www.bajajfinserv.in/sarfaesi-auction-notices** ही लिंक पहा.

तारीख: ०३.०३.२०२५
ठिकाण: पुणे

बजाज फायनान्स लिमिटेड
अधिकृत अधिकारी

१०८ रुग्णवाहिकेच्या कंपनीला वाचवण्यासाठी डॉ .बनसोडे यांचे निलंबन

उल्हासनगर, दि. ०७ (वार्ताहर) : राज्यात रुग्णाना सेवा मिळावी म्हणुन शासनाने भारत विकास गृप या कंपनीला रुग्णवाहिका पुरवन्याचे काम दिले आहे. परंतु या कंपनी कडुन रुग्णाना वेळेवर उपचार मिळवन्यासाठी वेगळ्या रुग्णालयात नेन्या करिता रुग्ण वाहिका ही १०८ या क्रमांकावर उपलब्ध व्हावी म्हणुन फोन करण्यात येतो परंतु फोन करुन पण यांची रुग्णवाहिका वेळेवर पोहचत नसल्याने रुग्णाना जीव गमवावा लागतो. असाच प्रकार २३ जानेवारी रोजी उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात घडला आहे. सहा तास १०८ रुग्णवाहिका आली नाही म्हणुन राहुल इदाटे या रुग्णाला आपला जीव गमवावा लागला आहे. मात्र या प्रकरणी शासनाने भारत विकास गृप या कंपनीवर कोणती ही कारवाई न करता रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ . मनोहर बनसोडे यांच्यावर निलंबनाची कारवाई केली असुन ही कारवाई चुकीची आहे. बनसोडे यांनी आम्हाला चांगले सहकार्य केले असुन त्यांच केलेल निलंबन रद्द करण्यात यांव अशी प्रतिक्रिया राहुल इदाटे यांच्या भावाने पत्रकाराना दिली आहे.

उल्हासनगर कँप २ येथील हर्षवर्धन नगर येथे राहणारे राहुल इदाटे यांना २२ जानेवारी रोजी मध्यवर्ती रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. दरम्यान त्यांच्या तब्येती मध्ये सुधारणा होत नसल्याने त्यांच्या नातेवाईकाना राहुल याना कळवा येथे नेण्यास सांगितले . दरम्यान २३ जानेवारी रोजी दुपारी त्यांच्या नातेवाईकानी १०८ या रुग्णवाहिकेला फोन केला . तेव्हा रुग्णवाहिका सहा तास आलीच नाही अखेर राहुल याला आपला जीव गमवावा लागला. दरन्यान १०८ या रुग्णवाहिका पुरवणाऱ्या भारत विकास गृप (महाराष्ट्र इमर्जंसी मेडिकल सर्व्हिस १०८) या कंपनीची तक्रार राष्ट्रवादीचे प्रवक्ते शिवाजी रगडे यांनी शासनाकडे केली होती. दरम्यान या तक्रारीवरुन कंपनीवर कोणती ही कारवाई केली नाही. उलट एका आमदाराने विधानसभेत तारांकीत प्रश्न घेवुन मध्यवर्ती रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ . मनोहर बनसोडे यांना जबाबदार धरुन त्यांच निलंबन केले आहे. दरम्यान राहुल इदाटे करिता डॉ . बनसोडे यांनी चांगल्या प्रकारे सहकार्य केले असुन त्यांच केलेले निलंबन हे चुकीचे असुन त्यांच निलंबन रद्द करण्यात यांव अशी मागणी शिवाजी रगडे यांनी केली आहे. तर राहुल यांच्या भावाने सुध्दा बनसोडे यांनी आम्हाला चांगले सहकार्य केले असल्याचे सांगितले असुन त्यांच निलंबन रद्द करुन भारत विकास गृप (१०८) या कंपनीवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी पत्रकाराना दिलेल्या मुलाखतीत केली आहे .

जाहीर सूचना

सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, माझे अशील **राजश्री तुकाराम दाभोळकर, आर. टी. कांबळे** हे फ्लॅट क्र. ०८, १ ला मजला, भविष्य सिद्धी सीएचएसएल, सुदाम नगर, एमआयडीसी, एमएसईबी कार्यालयजवळ, प्लॉट क्र. आरएच९९, एमआयडीसी (रहिवासी क्षेत्र) केव-२, गाव गोळवली डोंबिवली (पूर्व) तालुका कल्याण, जिल्हा ठाणे ४२१ २०३ (मोज. क्षेत्रफळ ७०३ चौ. फूट बिल्ट अप) धारक मालमत्तेचे कायदेशीर मालक आहेत.

मूळ भविष्य सिद्धी सीएचएसएल बांनी आर. **टी. कांबळे, राजश्री तुकाराम दाभोळकर** यांना दि. ०६.०३.१९९१ रोजी जे करार आबंटित केले ते अनोंदणीकृत होते.

आता माझे अशील **राजश्री तुकाराम दाभोळकर** हे त्यांचा मुलगा **विश्वजीत तुकाराम दाभोळकर** यांच्यासह सदर वरील फ्लॅट जागा गहाण ठेवण्यास इच्छुक आहेत.

जर कोणाही व्यक्तीस/ व्यक्तीना, कायदेशीर वारस, संस्था, बँक यांना सदर वरील सदर फ्लॅट जागा संबंधात कोणतेही आक्षेप, दावे, प्रभार वा काही असल्यास त्यांनी सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून ०७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अधोहस्ताक्षरित यांना संबंधित पुराव्यांसह सूचित करावे अन्यथा दावे गृहित धरले जाणार नाहीत.

दि. ०८.०३.२०२५

प्रदिप कुमार तिवारी
(वकील उच्च न्यायालय)
पत्ता ४०४, ४ था मजला, साई परीचय बिल्डींग, साई बाबा नगर, नवघर रोड, भाईंदर पूर्व, ठाणे ४०१ १०५.

जाहीर सूचना

सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, माझे **अशील श्रीम. कोमल धिमंत बलदोता, धिमंत संजय बलदोता, रंजन संजय बलदोता व संजय कुंदनमाल बलदोता** हे फ्लॅट क्र. ११०२, ११ वा मजला, बी विंग, बिल्डींग क्र. ०७, कुकरेजा कॉम्प्लेक्स बिल्डींग क्र. ७बी सीएचएसएल, जैन मंदिर समोर, एलबीएस मार्ग, भांडुप पश्चिम, मुंबई ४०० ०७८ येथील सीटीएस क्र. ४१९/ए१/१ भांडुप गाव, तालूका कुर्ला, मुंबई (मोज. क्षेत्रफळ ७३३ चौ. फूट बिल्ट अप) धारक मालमत्तेचे कायदेशीर मालक आहेत. माझे अशील यांनी वरील सदर फ्लॅट जागा **भरत कुमार बाबुलाल सोग्रा** व **शर्मिला भरत सोग्रा** यांच्याकडून विक्री करार अंतर्गत दस्तावेज क्र. केआरएल२/२१३४/२०२५ दि. ३१.०१.२०२५ अंतर्गत खरेदी केली होती व सदर लिंक दस्तावेज **१. प्रसाद इदीचंदी गीवारधेसे व जेसी प्रसाद इदीचंदी गीवारधेसे** यांच्या दरम्यान अंमलात आणले होते व ते मे. कुकरेजा डेव्हलोपमेंट कॉर्पोरेशन कडून विक्री करार दस्तावेज क्र. बीडीआर १३/०११८६/२००८ दि. ११.०२.२००८ अंतर्गत खरेदी केला व **२. प्रसाद इदीचंदी गीवारधेसे व जेस्सी प्रसाद** यांनी **संजय भिमराज जैन व संगीता भिमराज जैन** बांना विक्री करार अंतर्गत क्र. बीडीआर१४/०४४६७/२०१२ अंतर्गत दि. २०.०५.२०१२ अंतर्गत करार **श्री. भरत सोग्रा** यांच्याद्वारे गहाळ/ हरवले आहेत.

जर कोणाही व्यक्तीस/ व्यक्तीना, कायदेशीर वारस, संस्था, बँक यांना सदर वरील सदर फ्लॅट जागा संबंधात कोणतेही आक्षेप, दावे, प्रभार वा काही असल्यास त्यांनी सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अधोहस्ताक्षरित यांना संबंधित पुराव्यांसह सूचित करावे अन्यथा दावे गृहित धरले जाणार नाहीत.

दि. ०८.०३.२०२४

प्रदिप कुमार तिवारी
(वकील उच्च न्यायालय)
पत्ता ४०४, ४ था मजला, साई परीचय बिल्डींग, साई बाबा नगर, नवघर रोड, भाईंदर पूर्व, ठाणे ४०१ १०५.

सूचना

सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते की, दि. २८.०२.१९८५ च्या वाटप पत्रानुसार, सिडकोने सेक्टर ९ मधील प्लॉट क्रमांक ९ए वर बांधलेले सुमारे ९७.१८८ चौरस मीटरचे रो हाऊस क्रमांक आरएच- ४/ए-२ हे जमिनीतील १९.५७८३% अविभाजित हितसंबंधांसह, गट क्रमांक ५७ पं., गाव शहाबाज, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे श्रीमती नीलिमा ठाकूर यांना वाटप केले आहे आणि २८.०२.१९८५ च्या ताबा पत्रानुसार सिडकोने त्यांना ताबा दिला आहे. वरील रो हाऊस क्रमांक ए-२ च्या संदर्भात:

१. सिडको आणि श्रीमती निलीमा ठाकूर यांच्यात २८.०२.१९८५ रोजी झालेल्या विक्रीसाठीचा पहिला मूळ करार आणि.

२. सिडकोने १२.०९.१९८५ रोजी जारी केलेले दुसरे मूळ घोषणापत्र